# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र.४३२ दिनांक ०८/०५/२०२०

बोईसर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. I १६१/२०२० भादवि ३०२ प्रमाणे हा गुन्हा दिनांक ०७/०५/२०२० रोजी ०५.१७ वा. दाखल असुन गुन्हयातील आरोपीत रामविलास चंद्रदेव राजभर, वय ४२ वर्षे, मूळ रा. बहुना, पो.बहुना, थाना मरदा, जि. गाजीपूर, राज्य उत्तरप्रदेश हा मयत जगनदेव दुबारी राजभर, वय ५५ वर्षे, याचा नात्याने मामेसासरा आहे. त्यांचे बोईसर पालघर रोडवर, जेष्ठ नागरिक बंधु भगीनी मंडळ, संपर्क कार्यालय, यशवंत सृष्टी समोर, राजेश टायरवाला यांचे दुकानाचे शेजारी चहानाष्टाची टपरी असुन ते चहा नाश्ताची टपरी चालवुन त्यांचा उदरनिर्वाह करीत होते.

दिनांक ०६/०५/२०२० रोजी दुपारी १२.०० वाजताचे सुमारास मयत जगनदेव दुबारी राजभर याने आरोपीत रामविलास चंद्रदेव राजभर यास दारू पिण्याचे व पैशांचे कारणावरून डोकीत बांबुचे दांडक्याने उपटी मारून दुखापत करून त्या ठिकाणावरून आरोपीत रामविलास चंद्रदेव राजभर हा पळून गेला होता.

त्यानंतर सायंकाळी १६.०० वाजताचे सुमारास पुन्हा आरोपीत त्या ठिकाणी परत येऊन दुपारी झालेल्या भांडणाचा मनात राग धरून मयत जगनदेव दुबारी राजभर यास बांबुचे दांडक्याने डोकीत, उजवे कानावर मारहाण करून त्यास गंभीर जखमी अवस्थतेच सोडून पळुन गेला होता.

जखमी अवस्थेत जगनदेव दुबारी राजभर यास दवाउपचाराकामी ग्रामिण रुग्नालय, बोईसर येथे दाखल केले असता त्याचेवर दवाउपचार सूरू असतांना डॉक्टरांनी त्यास २२.०० वाजताचे सुमारास उपचाराअंती मयत झाल्याचे घोषीत केले होते.

आरोपीत रामविलास चंद्रदेव राजभर याचा बोईसर परीसरात शोध घेतला असता आरोपीत हा बोईसर रेल्वे यार्डात एका ट्रकचे आडोशाला बसलेला मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेऊन गुन्हयात अटक करण्यात असुन गुन्हयाचा तपास मा. अप्पर पोलीस अधिक्षक सो, पालघर श्री. विक्रांत देशमुख, व मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सो, बोईसर विभाग, बोईसर श्री. विश्वास वळवी यांचे मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. प्रदीप कसबे हे करीत आहेत.